राज्यशासनाच्या जाहिरात यादीवर असलेले व सर्व प्रकारच्या घडामोडींचे वेध घेणारे एकमेव निर्भिड साप्ताहिक
Website : www.gahininathsamachar.in, com
WEEKLY



# गहिनीनाथ समाचार



संपादक - श्री. सम्राट दिलीपराव सणगर (B.E. E&TC)
वर्ष २५ वे अंक ३१ वा बुधवार दि.१७-०४-२०२४ पाने ४ कि.: १० रू. वार्षिक वर्गणी २५० रू.
Posts Registration : KLR-334/2022-2024 ❋ RNI No. 71612/99 Dt. 10-9-99 ❋ E-Mail - samachar.gahininath@gmail.com

## नामदार हसनसो मुश्रीफ वाढदिवस विशेषांक

# जिल्हाचे विकास पुरुष - नामदार हसन मुश्रीफ साहेब

महाराष्ट्र राज्याचे वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री, पालकमंत्री कोल्हापूर जिल्हा तसेच कागल विधानसभा मतदारसंघातील आमदार हसन मुश्रीफ साहेब यांचा आज वाढदिवस. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना स्वकर्तृत्वावर भरारी घेणारे व्यक्तिमत्व म्हणजे मुश्रीफ साहेब ! त्यांनी केलेली वाटचाल लक्षवेधी ठरणारी आहे. आज त्यांच्या वाढदिवसा निमित्त हसन मुश्रीफ यांच्या कारकीर्दीचा घेतलेला हा आढावा.... !

राजर्षी छ. शाहू महाराजांचे जन्मस्थान म्हणून कागलला ओळखले जाते. याच कागल नगरीत हसन मुश्रीफ यांचा २४ मार्च १९५६ रोजी जन्म झाला. सामान्य परिस्थिती असलेल्या कुटुंबात जन्मलेल्या हसन मुश्रीफ यांनी आपले कर्तृत्व सिद्ध करून दाखविले. कागल तालुक्यातल्या समाजानेही त्यांना डोक्यावर घेतले. त्यांची राजकीय जीवनाची सुरुवात शिवाजी विकास संस्थेच्या संचालक पदाच्या माध्यमातून झाली. मौजे सांगाव येथील थोर राजकारणी शामराव भिवाजी पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राजकारणाचे धडे गिरवले. त्यांच्यासोबत काम करताना ते राजकारणाचे बारकावे शिकले. शामराव पाटील यांच्याशी वैचारिक मतभेदानंतर त्यांनी सहकार महर्षी राजे विक्रमसिंह घाटगे यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यास सुरुवात केली. राजर्षी छत्रपती शाहू साखर सह. कारखाना उभारणीत त्यांचा मोलाचा वाटा होता. ते कारखान्याचे संस्थापक संचालक होते. काही कारणाने १९८४ मध्ये राजेनी त्यांना कारखान्याच्या संचालक मंडळातून वगळले. त्यानंतर त्यांनी लोकनेते खास. सदाशिव मंडलिक यांच्या नेतृत्वाखाली काम करण्यास सुरुवात केली. प्रत्येक निवडणुकीत मुश्रीफ यांनी त्यांच्या सेनापतीची



भूमिका पार पाडत विजयश्री खेचून आणली. विधानसभेच्या निवडणुकीत मंडलिकांच्या २३१ मतांनी विजय झाला. या विजयात मुश्रीफ यांचा मोलाचा वाटा होता. त्यानंतर ते कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक झाले. त्यांनी जिल्हा बँकेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष पदावरूनही काम केले. त्यांनी जिल्हा मध्यवर्ती बँक शेतकऱ्याच्या बांधापर्यंत नेली. पंचायत समिती सभापती असताना खऱ्या अर्थाने त्यांची नाळ तालुक्यातील सर्वसामान्य जनतेशी जुळली.

एखादे समाजमान्य नेतृत्व सहजासहजी तयार होत नसते त्यासाठी अहोरात्र कष्ट करावे लागतात. जनतेचे पाठबळामुळेच मुश्रीफ यांची निर्वेध वाटचाल सुरु आहे. पक्षाशी एकनिष्ठता व बांधिलकी ठेवून जनतेच्या हितासाठी विकासाच्या वाटेवर चालताना प्रसंगी स्थानिक राजकारण दुर्लक्षित करणे हे त्यांचे वैशिष्ट्य. त्यांनी आपल्या नेतृत्वाचा ठसा केवळ कागल तालुक्या पुरता मर्यादित न ठेवता कोल्हापूर जिल्ह्यासह राज्याच्या पातळीवर त्यांनी उमटविला आहे.

सर्वांना बरोबर घेऊन जाणारे नेतृत्व व राजकारणाची पक्की जाण असणारा नेता म्हणून मुश्रीफ साहेब यांची ओळख आहे. समाजकारणात त्यांची उंची खूपच मोठी आहे. एकेकाळी महागड्या असणाऱ्या आरोग्याच्या सोयी सुविधा त्यांनी गोरगरीब जनतेच्या घरापर्यंत नेल्या आहेत. एक रुपयाची गोळी घेण्याची ऐपत नसलेल्या हजारो लोकांचे मुंबईमध्ये नामांकित हॉस्पिटल मध्ये नेऊन मोफत ऑपरेशन करून देऊन त्यांना जीवदान देण्याचे काम त्यांनी केले आहे. आजही त्यांनी ते कार्य अखंडपणे चालू ठेवले आहे. हीच त्यांची पुण्याई खात्यात जमा झालेली आहे.

पान ५ वर






















| कालावधी | ठेव प्रकार | व्याजदर |
|---|---|---|
| ४६ ते ९० दिवस | अल्पमुदत | ६% |
| ९१ ते १८० दिवस | अल्पमुदत | ७% |
| ६ महिने ते १२ महिने | मुदतबंद | ८% |
| १३ महिने ते २४ महिने | मुदतबंद | ८.५% |
| २५ महिने ते ३६ महिने | मुदतबंद | ९% |



संपादकीय

# क्रांतिसूर्य 'महात्मा जोतीबा फुले'



महात्मा जोतीबा फुले (जोतिराव गोविंदराव फुले) यांना १९ व्या शतकातील समाजसुधारक म्हणून ओळखले जाते. भारतीय समाजात पसरलेल्या अनैतिक वाईट गोष्टी दूर करण्यासाठी त्यांनी अविरत संघर्ष केला. अस्पृश्यता निवारण, महिला शिक्षण, विधवा पुनर्विवाह आणि शेतकऱ्यांच्या हितासाठी जोतीबानी उल्लेखनीय काम केले. वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्था या शोषण व्यवस्था असुन जोपर्यंत या पुर्णपणे नामशेष होत नाहीत तोवर एक समाजाची निर्मितती असंभव आहे अशी त्यांची रोखठोक भुमिका होती. अशी भुमिका मांडणारे ते आद्य समाजसुधारक राजाराम मोहन रॉय यांच्या नंतरचे दुसरे भारतीय होते. जातिव्यवस्था निर्मूलना संकल्पना आणि आंदोलनाचे ते प्रणेते ठरले. महात्मा गांधीजींनी ज्योतिबांना 'खरा महात्मा' असे म्हंटले आहे व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी फुलेंना आपले गुरू मानले.

त्यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी महाराष्ट्रातील सातारा येथे झाला. जोतिबांच्या वडिलांचे नाव गोविंदराव आणि आईचे नाव चिमणाबाई होते. शेवटच्या पेशव्यांच्या काळात महात्मा फुले यांचे वडील फुले पुरवण्याचे काम करीत होते, त्यामुळे गोर्हेळ हे त्यांचे मूळ आडनाव असले तरी, पुढे ते फुले म्हणून ओळखले जाऊ लागले व तेच नाव पुढे रूढ झाले. त्याचे कुटुंब खूप गरीब होते आणि आपल्या उदरनिर्वाहासाठी बागेत माळी काम करीत असत. ज्योतीबा जेव्हा एक वर्षाचे होते तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचे पालनपोषण सगुणाबाईंनी केले त्यांनी केले व त्यांना आईचे प्रेम दिले.

वयाच्या ७ व्या वर्षी जोतीबाला गावातील शाळेत शिक्षणासाठी पाठवले गेले. जातीभेदामुळे त्यांना शाळा सोडावी लागली. शाळा सोडल्यानंतरही त्यांच्यात अभ्यासाची तीव्र इच्छा होती. सगुणाबाईंनी जोतीबाला घरी अभ्यास करण्यास मदत केली. जोतीबा हे घरगुती कामानंतर उरलेल्या वेळेत पुस्तके वाचत असत. जोतीबा आसपासच्या वडिलधाऱ्या लोकांसोबत विविध विषयांवर चर्चा करायचे. त्यांच्या सूक्ष्म आणि तार्किक गोष्टींनी लोक खूप प्रभावित होत असत. महात्मा फुले १३ वर्षाचे असतांना इ.स. १८४० मध्ये त्यांचा विवाह नारगावच्या खंडोबा नेवसे पाटील यांची मुलगी सावित्रीबाईशी झाला. त्यावेळी सावित्रीबाईचे वय ८ वर्षाचे होते.

फादर लिजिट हे जोतीबाचे शेजारी होते. बालक जोतीबाची कौशल्य आणि शिक्षणाची आवड पाहून त्यांनी त्याला परत शाळेत पाठविण्यासाठी प्रयत्न केला. जोतीबा पुन्हा शाळेत जाऊ लागले. ते नेहमीच शाळेत प्रथमच यायचे. धर्मावर टीका टिप्पणी ऐकताच त्यांना इतकी असमानता का आहे याबद्दल उत्सुकता होत असे. जातीभेद आणि वर्ण व्यवस्था म्हणजे काय ? ते आपला मित्र सदाशिव बल्लाळ गोंडवे यांच्यासमवेत समाज, धर्म आणि देशाबद्दल चर्चा करीत असत. त्याना या प्रश्नाचे उत्तर कधीच सुचत नसत. इतका मोठा देश गुलाम का आहे? त्यांना गुलामगिरीचा द्वेष होता. त्यांना कळून चुकले की जाती-धर्मांमध्ये विभागलेल्या या देशातील सुधारणा तेव्हाच शक्य आहे जेव्हा लोकांची मानसिकता सुधारेल. त्यावेळी समाजात वर्गभेद शिगेला पोहचला होता. महिला आणि दलित समाजाची स्थिती चांगली नव्हती. त्यांना शिक्षण नाकारण्यात येत होते. ज्योतीबांना या परिस्थितीबद्दल फार वाईट वाटत होते. त्यांनी महिला आणि दलितांच्या शिक्षणासाठी विडा उचलला. त्यांचा असा विश्वास होता की ज्या मुलांवर संस्कार करतात अशा मातांना शिक्षण दिले तर भावी पिढी उज्वल निपजेल. म्हणूनच मुलींना शिक्षण देणे आवश्यक आहे.

वंचितांच्या शिक्षणासाठी शाळा काढण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्यावेळी जातीभेद खूप फोफावलेला होता. दलित आणि महिलांच्या शिक्षणाचा मार्ग बंद होता. ही व्यवस्था मोडण्यासाठी जोतीबा आपल्या घरात दलित आणि मुलींना शिकवत असत. ते मुलांना लपवून आणत आणि घरी पोहचवून देत. जसे त्यांचे समर्थक वाढले तसे त्यांनी उघडपणे शाळा चालविणे सुरू केले.

शाळा सुरू झाल्यानंतर ज्योतीबांना अनेक अडचणींचा सामना करावा लागला. त्यांच्या शाळेत कोणीही शिकवायला तयार होत नव्हते. जरी कोणी शिकवले तरी सामाजिक दबावामुळे त्याला लवकरच हे काम थांबवावे लागे. या शाळांमध्ये कोण शिकवणार? ही एक गंभीर समस्या ज्योतिबांसमोर निर्माण झाली होती. ज्योतीबांनी या समस्येवर उपाय शोधण्यासाठी आपली पत्नी सावित्रीला शिकवले आणि त्यानंतर नॉर्मल स्कूल ऑफ मिशनरीमध्ये प्रशिक्षण घ्यायला लावले. प्रशिक्षणानंतर त्या भारताची पहिली प्रशिक्षित महिला शिक्षिका बनल्या. त्यांच्या या कार्यामुळे समाजातील लोक संतापले. जेव्हा सावित्रीबाई शाळेत जात पान ३ वर

## 'कॉर्नर' गटारीं मुळे अनेक अपघात; गटारींच्या सेफ्टी प्रमाणकांकडे दुर्लक्ष, गटारीना पक्के कठडे बांधण्याची मागणी



पंचमुखी चौकातील वळणावरील धोकादायक गटार

**कागल : कागल शहरातील रस्त्याच्या कोपऱ्यावरील खोल गटारी धोकादायक बनल्या असून, या कॉर्नर गटारींमुळे दुचाकीधारकांचे अनेक छोटे मोठे अपघात होत आहेत. वाहनधारक समोरील गाडीस वाट देण्याच्या नादात संतुलन बिघडून या गटारीत पडत आहेत. यामुळे या गटारीना पक्के कठडे बांधण्याची मागणी नागरीकातून होत आहे.**

कागल शहरात विशेषता पंचमुखी चौकातील शिवकृपा मेडिकल जवळच्या कॉर्नर गटार खूप धोकादायक बनली असून या तीव्र वळणार दुचाकी वाहनधारक समोरील गाडीस वाट देण्याच्या नादात संतुलन बिघडून या गटारीत पडत आहेत. कारण रस्त्यांची उंची वाढली असून त्यामानाने गटारीची खोली जास्त आहे. तसेच चारचाकी वाहनाचे देखील मागील चाक या वळणावर गटारीत जाऊन अपघात झाले आहेत.

अशीच परिस्थिती कागल मध्यवर्ती एसटी स्थानका समोरील उड्डाणपूला खालील दोन्ही बाजूकडील गटारींची आहे. मुळात या ठिकाणच्या दोन्ही बाजूकडील गटारी या खोल दरी बनल्या आहेत. रस्ते करताना गटारींच्या सेफ्टी प्रमाणकांकडे दुर्लक्ष झाल्याचे स्पष्ट दिसत आहे. तरी या सर्व कोपऱ्या वरील गटारीना पक्के कठडे बांधण्याची मागणी नागरिक करत आहेत.



उड्डाणपूला खालील दोन्ही बाजूकडील धोकादायक गटारी

## गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर नाम. गोपाळकृष्ण गोखले शाळेतमध्ये प्रवेशोत्सव



**कागल (शकील ताशिलदार) : मंगळवार दि. ९ एप्रिल रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर कागल येथील नामदार गोपाळकृष्ण गोखले शाळेमध्ये व भाग शाळा इयत्ता पहिलीसाठी प्रवेशोत्सव उपक्रम पार पडला.**

कागल शहरातील मध्यवर्ती ठिकाणी सुसज्ज इमारत व भव्य क्रीडांगण उपक्रमशील शाळेत इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी करण्यात आली. विद्यार्थ्यांना अंकलपी, पुष्प व खाऊ वाटप करून पाटी पूजन करण्यात आले. पालकांनी आपल्या मुलांचा प्रवेश निश्चित केला. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नदाफ, सर्व शिक्षक वृंद, शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## रुद्र गाडेकरचे आयटीएस परीक्षेत घवघवीत यश



**कागल : येथील श्री स्वामी समर्थ विद्यामंदिर शाळेचा इयत्ता दुसरीचा विद्यार्थी रुद्र सागर गाडेकर याने इंडियन टलेंट सर्च (आयटीएस) परीक्षेत राज्यात दुसरा क्रमांक पटकावला.**

रुद्र गाडेकर याने इंडियन टलेंट सर्च परीक्षेत २०० पैकी १९८ गुण मिळवले आणि समृद्धी प्रज्ञाशोध (एसटीएस) परीक्षेत १०० पैकी ९६ गुण मिळवले. तसेच ब्रेन डेव्हलपमेंट स्कॉलरशिप (बीडीएस) परीक्षेत १०० पैकी ७५ गुण मिळवून यश संपादन केले. त्याला शाळेच्या शिक्षिका सौ. पाटील, सौ. केसरकर, सौ. आंबी, सौ. दळवी यांचे मार्गदर्शन लाभले.

## धनादेश न वटल्याने एक वर्ष कारावासाची शिक्षा

**कागल : धनादेश न वटले प्रकरणी कागल येथील सोनार आरोपी राहुल जयवंत कौलवकर यास एक वर्ष कारावास व नऊ लाख रुपये दंड अशी शिक्षा कागल येथील प्रथम वर्ग न्यायालयाने दिली. या प्रकरणी अभिजित संकपाळ यांनी दिलेल्या फिर्याद दिली होती.**

कागल येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांनी दोन केसेस मध्ये मिळून एक वर्ष कारावास व नऊ लाख रुपये दंड अशी शिक्षा राहुल कौलवकर यांना ठोठवण्यात आली. सदर रक्कम न्यायालयात ३० दिवसाच्या आत न भरल्यास अधिक सहा महिन्याची शिक्षा भोगावी लागणार. फिर्यादी तर्फे ॲडव्होकेट व्ही. एम. हांचनाळे यांनी काम पाहिले.

## शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्याचा तणावातून तरुणाची आत्महत्या



**कागल (विक्रांत कोरे) : शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्याचा तणावातून करनूर (ता.कागल) येथील शिवप्रसाद उर्फ प्रणव नारायण घाडगे (वय २०) याने झाडाला दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केली. आत्महत्येचा प्रकार सोमवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास शेतात घडला.**

या घटनेची नोंद कागल पोलीस ठाण्यात झाली आहे. शेअर मार्केटमध्ये नुकसान झाल्याचा तणाव त्याच्यावर होता असे पोलिसातून सांगण्यात आले. कागल पोलीस स्टेशनचे हेड कॉन्स्टेबल पटेकर हे पुढील तपास करीत आहेत. त्याच्या पश्चात आई, वडील, दोन बहिणी असा परिवार आहे.

## विहिरीत पाय घसरून लहानग्याचा मृत्यू



**कागल : मधील हुजेब यासीन मुल्लाणी (वय ५) या लहान मुलाचा अनंत रोटो कागल येथील विहिरीत पाय घसरून मृत्यू झाला.**

ही घटना मंगळवार दि. ९ एप्रिल रोजी अंदाजे सकाळी आठच्या आसपास घडली. ही घटना ऐन सणाच्या वेळी घडल्याने परिसरातील नागरिकांतून हळहळ व्यक्त होत आहे.

## माजी सैनिक बाळासाहेब देसाई यांचा ९० वा वाढदिवस साजरा




**रणदेवीवाडी (शिवाजी फडतारे) : यळगुड येथे ब्रह्माकुमारी पाठशाला मध्ये माजी सैनिक बाळासाहेब देसाई यांचा वाढदिवस भक्तिमय भावनेने ब्रह्माकुमारी पाठशाला येथे भक्तिभावाने साजरा करण्यात आला.**

यावेळी कोल्हापूर जिल्हा ब्रह्माकुमारी संचालक सुनिता बहेनजी व सुषमा बहेनजी यांच्या शुभहस्ते देसाई यांचा सत्कार करण्यात आला. सुनीता बहेनजी म्हणाल्या, देसाई हे आजपर्यंत आपले जीवन भक्तीमय ईश्वरीय नामस्मरणात सेवा भावी वृत्ती ठेवून जगले आहेत, म्हणून त्यांनी वयाची ९० वर्षे पूर्ण केली आहेत.

एकनाथ शिंदे, प्रकाश यादव यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी सर्व देसाई कुटुंबीय, त्यांचे नातू सत्यजित, अर्जुन, वास्तुतज्ञ विनोद बानगे, शामराव खोत, अनिल चव्हाण, संजय देसाई, बागल व चव्हाण परिवार व महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

गहिनीनाथ समाचारच्या अंकातील जाहिराती या जाहिरातदारांनी दिलेल्या मजकुराप्रमाणे छापल्या जातात. या मजकूराच्या सत्यतेबाबतची खात्री वाचकांनी स्वतःच्या जबाबदारीवर करावयाची आहे. गहिनीनाथ समाचार यांचेवर याबाबत कोणतीही आर्थिक वा कायदेशीर प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष जबाबदारी राहणार नाही – संपादक

Printed and Published by Sumit Dilip Sangar on behalf of GAHININATH PRINTERS AND PUBLICATIONS, GAHININATH PRINTERS AND PUBLICATIONS is Owner of Gahininath Samachar weekly, Printed at Nitin Commercials Art Printers, 1035 E-Ward Shahupauri 6th Lane, kolhapur, published at 654, Shri Vitthal Krupa, Sangar Galli, Kagal, tal- Kagal, Dist-Kolhapur- 416216, Editor : Samrat Dilip Sangar
(R.N.I. No.71612/99) Vol: 25, Issue: 31, Date: 17/04/2024

गहिनीनाथ समाचार वीकली (R.N.I. No. 71612/99) हे पत्रक सुमित दिलीप सणगर यांचेद्वारा गहिनीनाथ प्रिंटर्स अँड पब्लिकेशन (मालक) यांचेसाठी मुद्रित व प्रकाशित, नितीन कमर्शियल आर्ट प्रिंटर्स १०३५, ई-वार्ड शाहूपुरी, सहावी गल्ली, कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे छापून आणि ६५४, श्री विठ्ठल कृपा सणगर गल्ली, कागल ता. कागल, जि. कोल्हापूर ४१६२१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादकः सम्राट दिलीप सणगर, मोबा. ९८२२२८३०५० फोनः (०२३२५) २४३७८८, Email: samachar.gahininath@gmail.com (या अंकामध्ये छापलेल्या मचकूराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. वादविवाद कागल न्याय कक्षेत)





# कविता

## निवडुका आल्या

निवडुका आल्या
कार्यकर्त्यानो उठा
नका करू आळस
प्रचाराला सुटा ।।
निवडूक हल्लीची
अटीतटीची आहे
कार्यकर्त्यानो तुमची
खरी कसोटी आहे ।।
पक्ष कुठला चिन्ह कोणत
चांगल लक्षात ठेवा
त्याचप्रमाणे प्रचाराची
दिशा आपली ठरावा ।।
नेत्यांची सारी मदार
कार्यकर्त्यावर असते
नेत्याला हे सारे
पक्के ठाऊक असते ।।
खर्च कितीही होवो
तयारी नेत्यांची असते
निवडून यावे एवढे
ध्येय त्याचे असते ।।
चहापाणी नाश्ता
धाबा ठराविक असतो
हवा पेट्रोल भरायला
पंप ठराविक असतो ।।
कार्यकर्त्यानो पंपावर
टाकी फुल्ल करा
अडचण येऊ नये
हवाही फुल्ल भरा ।।
घोषणा द्या दणकून
प्रचार करा जाम
विरुद्ध पार्टीला तर
फुटला पाहिजे घाम ।।
सभा असता नेत्यांची
गर्दी जमवा इतकी
विरोधकाला चांगली
भरली पाहिजे धडकी ।।
बायको मुल मागे आहेत
एवढ मात्र विसरू नका
भावनावश होऊन
डोकी फोडून घेऊ नका ।।
दिवसा भांडले नेते
रात्री एक होती
कार्यकर्त्यानो तुम्हीही
अशीच ठेवा नीती ।।

जहाँगिर नायकवडी
श्रमिक सोसायटी, कागल
मो. ९१५८५८०१०२


**छोटी जाहिरात .... मोठा प्रतिसाद .... !**

साप्ता. गहिनीनाथ समाचारमध्ये खास मासिक जाहिरात फक्त १००० रुपयांमध्ये छापण्यात येणार आहे. तरी सर्व जाहिरातदारांनी याची नोंद घ्यावी.
- संपादक



साहिल मुजावर
B.Sc.Optometrist
Mob-9922298994

**आय केअर ऑप्टीकल**
चष्माचे दुकान
सर्टीफाईड ऑप्टोमेट्रीस्टद्वारे नेत्र तपासणी
शास्त्रोक्त पद्धतीने डोळे तपासून व चष्मा बनवून मिळेल.
फॅन्सी व ब्रॅन्डेड, इंपोर्टेड फ्रेम्स ग्लासेस, गॉगल्स, कॉन्टक्ट लेन्स व नंबरचे चष्मे
विराट सिटी, भुयेकर पेट्रोल पंपामागे, एस.टी. स्टँड, कागल

**शिला एंटप्राईजेस**
विनायक हेरीरेज, गाळा नं. ५, एस. टी. स्टॅण्डजवळ, रिंग रोड, कागल, ता. कागल, जि. कोल्हापूर.
आमच्याकडे वॉटर प्रुफिंग सर्व केमीकल, वॉटर टँक, बेसमेंट, संडास, बाथरूम, स्लॅब, भिंत इ. वॉटर प्रुफिंग, स्लॅब, कोबा-जुने बंगला कॉंकट फौंन्डेशन इ. ब्रेकर मशिनने फोडून, स्लॅब, कॉंक्रीट, कॉलम बिम,रिबरिंग (चालबार) करून तसेच इपोक्शी कोटींग व ॲसीड प्रुफ बिल्डींगची कामे करून मिळतील.
प्रोप्रा. नागप्पा एस. निंबरगी
मोबा. ९४२२४१३७८२, ऑफीस ९८६०१५३९९२, (०२३२५) २४३१९२





**स्वस्ताईची कमाल सर्व सुविधांची धमाल !**
कागल तालुक्यातील सर्वात कमी दरातील सांस्कृतिक हॉल

**श्रमिक सांस्कृतिक हॉल (मंगल कार्यालय)**

| पॅकेज | सभासद | बिगर सभासद |
|---|---|---|
| लग्नकार्य | ६५०० रु. | ९५०० रु. |
| वास्तुशांती,वाढदिवस,बारसे, साखरपुडा | ५५०० रु. | ७००० रु. |
| वर्षश्राद्ध/उत्तरकार्य | ३००० रु. | ५५०० रु. |
| सभा वगैरे | ३००० रु. | ६५०० रु. |

टीप : वरील पॅकेज टेबल, खुर्च्या, शेगडी, भांडी, वधु-वरांच्या खोल्या, मुबलक पाणी व प्रशस्त पार्किंगसह आहे.

पत्ता : श्रमिक सोसायटी हॉल, कागल
संपर्क : चेअरमन - श्री. पी.डी.पोटे (मो.: 9260550705)
सचिव - श्री. बाबर कलावंत (मो.: 9423843088)


## संपादकीय

पान 3 वरून

तेव्हा लोक तिला वेगवेगळ्या प्रकारे अपमानित करीत असत. त्यांच्या अंगावर शेण घाण टाकत. पण त्यांनी एवढा अपमान होऊन सुद्धा आपले काम चालूच ठेवले. यावर लोकांनी ज्योतीबांना समाजामधून काढून टाकण्याची धमकी दिली आणि त्यांना त्यांच्या वडिलांच्या घरातून काढून टाकले. घरातून बाहेर काढल्यामुळे जोतीबा आणि सावित्रीला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. पण ते आपल्या ध्येयातून कधीही हटले नाही.

२४ सप्टेंबर इ.स.१८७३ रोजी महात्मा जोतीबा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. सत्यशोधक समाज सोसायटीचे ते पहिले अध्यक्ष आणि खजिनदार होते. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. त्याचवेळी त्या कन्याशाळेच्या शिक्षिका म्हणूनही कार्य करीत होत्या. धर्म, समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. तृतीय रत्न, छत्रपती शिवाजीराजे भोसले यांचा पोवाडा, विद्या खात्यातील ब्राह्मण पंतोजी, ब्राह्मणांचे कसब, गुलामगिरी, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांची कैफियत अशी ती पुस्तके आहेत. शेतकऱ्यांचा आसूड या आपल्या ग्रंथात त्यांनी शोषित शेतकऱ्यांचे विदारक चित्र रेखाटले. यातच त्यांनी शिक्षण, वसतिगृह, सिंचन, धरणे, तलाव, विहिरी यासारखे उपाय सुचवले.

१८५२ मध्ये दलितांना शिक्षण देण्यासाठी पहिली शाळा सुरु केली. १८६३ मध्ये बालहत्त्या प्रतिबंधक गृहाची स्थापना स्वतःच्या घरी केली. १८६४ मध्ये पुण्यात एक पुनर्विवाह घडवून आणला. १८६८ मध्ये स्वत:च्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. कृष्णराव भालेकर यांच्या मदतीने पुण्यातून दीनबंधू हे वृत्तपत्र १८७७ मध्ये सुरु केले. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. १८८० मध्ये महात्मा फुले यांनी कामगाराच्या प्रश्नाची वाचा फोडण्यासाठी नारायण लोखंडे यांच्या माध्यमातून बॉम्बे मिल असोसिअशन या संघटनेची स्थापना केली. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनपुढे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करावे अशी आग्रही मागणी केली. यामुळेच जनतेने त्यांना १८८८ साली 'महात्मा' ही पदवी दिली. महात्मा जोतीबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने कृषी कायदा संमत केला.

सत्यशोधक समाज भारतीय सामाजिक क्रांतीकरीता प्रयत्न करणारी एक अग्रणी संस्था ठरली. महात्मा जोतीबा फुले यांनी लोकमान्य टिळक, गोपाल गणेश आगरकर, न्या.रानडे, दयानंद सरस्वती यांच्या समवेत देशातील राजकारणाला व समाजकारणाला पुढे घेऊन जाण्याकरता देखील प्रयत्न केले. परंतु जेव्हां त्यांना या मंडळींची भुमिका अस्पृश्यांना न्याय देणारी वाटली नाही तेव्हां त्यांच्यावर देखील टिका केली. त्यांनी अशीच टीका ब्रिटिश सरकार, राष्ट्रीय सभा व कॉंग्रेस पक्षाविरोधात देखील केलेली आपल्याला दिसुन येते. अशा क्रांतीसुर्यास त्यांच्या जयंती निमित्त शतशः नमन !




कागदावर वजन ठेवल्यावर तो कागद हलत नाही हे खरं आहे... पण सरकारी कागदावर वजन ठेवले तरच तो वेगाने हलतो.


**पटेल फर्निचर्स**
आमचेकडे तिजोरी, टि. व्ही. शोकेश, डायनिंग टेबल,सोफासेट, कॉम्प्युटर टेबल, लाकडी बॉक्स बेड, दिवाण कर्लऑन गादी, फोल्डींग पाळणे, रिव्हाल्वींग चेअर व इतर सर्व प्रकारचे फर्निचर योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण
मजिद पटेल मोबा. 9371508003

पत्ता : शिवाजी मार्केट, सांगाव रोड, भुयेकर पंपासमोर,एस.टी. स्टॅन्ड जवळ कागल. (ऑ.) (०२३२५)२४३०८६


# आरोग्य घरगुती उपचार

**घरात असणाऱ्या साध्या गोष्टीतून आजारांवर घरच्या घरी उपचार करा.**

- बापू फराकटे, कागल
मो.: ९०२१८३५५७२

१) उन्हात जाऊन आल्यावर काही लोकांना चक्कर येते, अशावेळी १ कप पाण्यात अर्धा लिंबू पिळून ते प्यावे.

२) अंगावर घामोळे उठल्यास पाव वाटी चंदन उगाळून घेऊन त्यात धणे, वाळा, गुलाबजल घालावे व तो लेप घामोळ्यावर लावावा.

३) गर्मीवर उपाय म्हणून दवणा वनस्पतीचा रस घेऊन त्यात २ चमचे खडीसाखर मिसळून ते मिश्रण घ्यावे. गर्मी कमी होते.

४) मुळव्याधीचा त्रास असल्यास अर्धी वाटी ताकात अर्धा चमचा मिरपूड घालावी व हे मिश्रण १५ दिवस सकाळी उपाशी पोटी घ्यावे. त्रास कमी होतो.

छोटी जाहिरात ....
मोठा प्रतिसाद .... !
साप्ता. गहिनीनाथ समाचारमध्ये खास मासिक जाहिरात फक्त १००० रुपयांमध्ये छापण्यात येणार आहे. तरी सर्व जाहिरातदारांनी याची नोंद घ्यावी.
- संपादक

# संस्कार, गुणवत्ता व संतुलित आहाराची काळजी घेणारे: परिवर्तन गुरुकुल,कौलगे ता. कागल

**४ थी, ५,वी ६ वी व ७ वीसाठी मुला व मुलींचे निवासी व अनिवासीचे प्रवेश सुरू**

**प्रज्ञाशोध, शिष्यवृत्ती, नवोदयसह विविध कौशल्ये विकसित करण्यासही प्राधान्य**

वेगाने धावणाऱ्या आधुनिक जगात ज्या आदर्श पध्दतीने आपली मुले शिक्षण व संस्काराने घडली पाहिजेत तशी घडणार का? हा प्रत्येक पालकाला सवाल आहे. एकवेळ पैसा सोबत आहे पण विद्यार्थी आदर्श घडवण्यास आपल्याकडे पुरेसा वेळ किती आहे. हा देखील अस्वस्थ करणारा सवाल आहे. त्यामुळेच अशा काळात कौलगे (ता. कागल) येथील 'परिवर्तन गुरुकुल' हा एक दिलासा पालकांना लाभत आहे. याच आदर्शवत अशा गुरुकुलामध्ये येत्या शैक्षणिक वर्षासाठी (सन:२०२४-२५) इयत्ता ४ थी, ५ वी,६ वी व ७ वी साठी प्रवेश सुरू आहेत. रास्त फी मध्ये गुणवत्तेसोबत संस्कार देणार्या या गुरुकुलाचा पालकांनी जरूर विचार करायला हरकत नाही.

**या गुरुकुलाची वैशिष्ट्ये :**

* कौलगे, ता. कागल येथे रास्त फी घेऊन निवासी व अनिवासी अशा दोन्ही स्वरूपात (मराठी माध्यम) प्रशस्त, रमणीय, सात्विक वातावरणात विद्यार्थ्यांच्या ज्ञानदान व निवासाची सोय.
* सर्व खोल्या व परिसर सीसी टीव्हीने बंदिस्त
* प्रज्ञाशोध, शिष्यवृत्ती, नवोदय या परीक्षांच्या यशाबरोबरच त्याला एक परिपूर्ण विद्यार्थी घडविण्यासाठी विविध उपक्रम.
* सर्व परिसर बंदिस्त असल्याने कोणताही व्यत्यय येत नाही.
* टीव्ही व मोबाईलपासून मुक्त राहत ज्ञानार्जन.
* फक्त तोंडी मुलाखत नव्हे तर लेखी परीक्षा घेऊन नियुक्त केलेला अनुभवी, कुशल व झोकून देऊन ज्ञानदान करणारा अध्यापक वर्ग.
* महिन्यातून एक पालक मेळावा व याचवेळी प्रत्येक पालक त्यांचा विद्यार्थी व शिक्षक अशी व्यक्तिगत देखील चर्चा व प्रत्येकाची स्वतंत्र प्रोग्रेस फाईल द्वारे सुसंवाद..!
* नियमित पाठ्यपुस्तके, तसेच शालेय स्पर्धा परीक्षेसाठी शेकडो सराव चाचण्या घेतल्या जातात.
* नियमित मार्गदर्शकांसोबत - महिन्यातील किमान दोन रविवारी विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन
* व्हीडिओ कॉन्फरन्सद्वारे तज्ञांचे मार्गदर्शन व ई-लर्निंगची सुविधा.
* आत्मविश्वास, प्रेरणा, कौशल्ये व संस्कार
* रुजविण्यासाठी विवीध नाविन्यपूर्ण उपक्रम व स्पर्धांचे आयोजन
* निवासी मुलांना आंघोळीसाठी गरम पाण्याची सोय.सर्व मुलांना पिण्यासाठी प्युरिफायर केलेले शुध्द पाणी दिले जाते.
* निवासी मुलांची कपडे धुवून दिली जातात.

**असा आहे समतोल व सकस आहार..**

डॉक्टरांच्याशी चर्चा करून आरोग्यदायी आहाराचे नियोजन गुरुकुलमध्ये करण्यात आले असुन त्याचे तंतोतंत पालन केलेच जाते सकाळी दूध, दुधाबरोबर ड्रायफ्रूट्स (काजू, भिजवलेले बदाम, बेदाणे, काळे मनुके, खजूर), जेवणामध्ये सकाळी चपाती, रात्री भाकरी, नाचना भाकरी, नाचणा आंबील, पनीर भाजी, छोले, पालेभाज्या, फळभाज्या, कुर्मा, भजी, डांगर, मोडाची उसळ, मसाले भात, जीरा भात, आमटी, वरण, सलाड, लोणचे व आठवड्यातून दोन वेळा गोड पदार्थ दिले जातात. यामध्ये शेवयाची खीर, आम्रखंड, गुलाबजाम, शिरा, सोजी, गव्हाची खीर असा परिपूर्ण आहार दिला जातो. रोजच्या ठरलेल्या मेनू तत्त्यानुसारच मुलांना आहार दिला जातो.व पालकांच्या ग्रुपला रोज सकाळी संध्याकाळी या जेवणाच्या ताटाचे फोटो टाकले जातात.

**सामान्य बुध्दिमत्तेच्या विद्यार्थ्यांना देखील गुणवंत बनवण्याचा प्रयास.!**

८० टक्के गुण असणाऱ्या विद्यार्थ्याला प्रवेश देऊन त्यांना ९० टक्क्यांवर नेणे याबरोबरच ४० टक्केवाल्या विद्यार्थ्यांना देखील ७५ टक्क्यांवर नेणे हे पण या गुरुकुलचे वैशिष्ट्य आहे.व असे प्रवेश पालक आमच्याकडे जाणीवपूर्वक करीत आहेत. चौथी ते सातवीची आठ ते दहा मुले अशी होती की, त्यांना बाराखडी व अक्षर ओळख देखील लागेना. तेंव्हा या गुरूकुलमधील शिक्षकांनी या मुलांसाठी विशेष वर्ग चालवून त्यांना सक्षम केले आहे. आता हीच मुले २५ ते ३० पर्यंतचे पाढे म्हणताहेत. केवळ मेरिट असणार्या नव्हे तर नसणार्या मुलांना देखील घडवणे हे या गुरुकुलाचे उद्दिष्ट आहे.

**अशा या वैविध्यपूर्ण गुरुकुलच्या प्रवेशासाठी जरूर संपर्क करा - सौ. सुलोचना शिंदे 8999614897, श्री. दीपक मुळे 8530632708, श्री. तानाजी पाटील 9960304289, टीप: प्रत्येक वर्गासाठी फक्त १५ मुले घेतली जातील**


साहिल मुजावर
B.Sc.Optometrist
Mob-9922298994
आय केअर ऑप्टीकल
चष्माचे दुकान
सर्टीफाईड ऑप्टोमेट्रीस्टद्वारे नेत्र तपासणी
शास्त्रोक्त पद्धतीने डोळे तपासून व चष्मा बनवून मिळेल.
फॅन्सी व ब्रॅन्डेड, इंपोर्टेड फ्रेम्स ग्लासेस, गॉगल्स, कॉन्टक्ट लेन्स व नंबरचे चष्मे
विराट सिटी, भुयेकर पेट्रोल पंपामागे, एस.टी. स्टँड, कागल

पटेल फर्निचर्स
आमचेकडे तिजोरी, टि. व्ही. शोकेश, डायनिंग टेबल,सोफासेट, कॉम्प्युटर टेबल, लाकडी बॉक्स बेड, दिवाण कर्लऑन गादी, फोल्डींग पाळणे, रिव्हाल्वींग चेअर व इतर सर्व प्रकारचे फर्निचर योग्य दरात मिळण्याचे एकमेव ठिकाण

मजिद पटेल मोबा. 9371508003
पत्ता : शिवाजी मार्केट, सांगाव रोड, भुयेकर पंपासमोर,एस.टी. स्टॅन्ड जवळ कागल. (ऑ.) (०२३२५)२४३०८६

# आधुनिक तंत्र शेतीसाठी सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याचे मोठे योगदान

## सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखाना व कागल तालुका खरेदी विक्री संघाच्या संयुक्त विद्यमानाने सुरु

कागल : कागलमध्ये कागल तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या आवारामध्ये सरसेनापती संताजी घोरपडे साखर कारखान्याच्या सरसेनापती संताजी घोरपडे माती परीक्षण प्रयोगशाळेची सुरुवात वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री, पालकमंत्री नाम. हसनसो मुश्रीफ यांच्या हस्ते झाली.

माती व पाणी परीक्षणामुळे जमीन, पिकाच्या गरजेनुसार आवश्यक कृषी निवेष्ठांचा पुरवठा करणे सोयीचे होते. यामुळे उत्पादन खर्चात घट होऊन भरघोस उत्पादन घेणे शक्य आहे. त्यामुळे या प्रयोगशाळेमध्ये माती व पाणी माफक दरात तपासून दिली जाणार आहे. सर्व शेतकऱ्यांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन केले. या प्रयोगशाळेमध्ये माती व पाणी तपासणीकरिता सर्व प्रकारचे अद्यावत मशिनरी प्रणाली उपलब्ध केली असून कारखान्याचे इतर ऊस विकास योजनासोबत तज्ञ कर्मचाऱ्यांमार्फत राबवली जाणार आहे.

यावेळी कागल तालुका सहकारी खरेदी विक्री संघाचे अध्यक्ष ड. जीवनराव शिंदे, उपाध्यक्ष महेश चौगुले, संचालक सम्राट सणगर, मॅनेजर श्री. हेगडे, कारखान्याचे ऊस विकास अधिकारी उत्तम परीट, शेती मदतनीस व कर्मचारी उपस्थित होते.



सरसेनापती संताजी घोरपडे माती परीक्षण प्रयोगशाळेची सुरुवात वैद्यकीय शिक्षण व विशेष सहाय्य मंत्री, पालकमंत्री नाम. हसनसो मुश्रीफ यांच्या हस्ते संपन्न यावेळी संघाचे अध्यक्ष ॲड. जीवनराव शिंदे, उपाध्यक्ष महेश चौगुले, संचालक सम्राट सणगर, मॅनेजर श्री. हेगडे, कारखान्याचे ऊस विकास अधिकारी उत्तम परीट, शेती मदतनीस व कर्मचारी उपस्थित होते.

# श्री बसवेश्वर विकास सेवा संस्थेच्या ऑनलाइन सुविधा केंद्राची सुरुवात

पिंपळगाव खुर्द (प्रकाश पाटील) : राज्य सरकार व केंद्र सरकार यांच्या माध्यमातून विविध योजना राबविल्या जात आहेत. या योजनेचे फॉर्म भरण्यासाठी सध्या ऑनलाईन सेवेची गरज ओळखून श्री. बसवेश्वर विकास सेवा संस्थेच्या माध्यमातून ऑनलाइन सुविधा केंद्राची सुरुवात करण्यात येत आहे. या केंद्राच्या माध्यमातून गावातील सर्व लोकांना आता स्थानिक पातळीवरती विविध योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी संस्थेच्या माध्यमातून सहकार्य केले जाईल, असे प्रतिपादन तालुका खरेदी विक्री संघाचे व्हा. चेअरमन महेश चौगुले यांनी केले. ते पिंपळगाव येथील बसवेश्वर विकास सेवा संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या सीएससी सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. भिवा आकुर्डे यांच्या हस्ते या सीएससी सेंटरचे उद्घाटन करण्यात आले.



श्री बसवेश्वर विकास सेवा संस्थेच्या माध्यमातून सुरू करण्यात आलेल्या सीएससी सेंटरच्या उद्घाटन प्रसंगी विविध मान्यवर

उद्घाटन प्रसंगी भिवा आकुर्डे बोलताना म्हणाले की, सध्याचा जमाना हा ऑनलाईनचा जमाना असून शासनाच्या विविध योजना ह्या लोकांना शासकीय कार्यालयात न जाता या सेंटरच्या माध्यमातून त्याचा लाभ घेता येऊ शकतो. त्यामुळे गावातील लोकांना ह्या सेंटरचा मोठा फायदा होणार आहे.

पिंपळगावचे उपसरपंच सदाशिवराव चौगुले म्हणाले, संस्थेच्या माध्यमातून आजपर्यंत अनेकांना लाभ मिळवून दिलेले आहेत. आता या सेंटरच्या माध्यमातून गावातील लोकांना तालुक्याच्या ठिकाणी व इतर ठिकाणी न जाता स्थानिक पातळीवरच शासनाच्या विविध योजनांचे फॉर्म भरता येणार आहेत. याचा लाभ गावातील सर्व नागरिकांनी घ्यावा असेही आवाहन त्यांनी केले.

यावेळी महादेव मगदुम, आप्पासो यादव, आनंदराव पाटील, तुकाराम मगदूम, कल्लापा आवटे, अभय चौगले, शैला मर्दाने आदी सह गावातील विविध मान्यवर, संस्थेचे पदाधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक राहुल पवार यांनी केले तर आभार तानाजी आकुर्डे यांनी मानले.

# जिल्हाचे विकास पुरुष 'नामदार हसन मुश्रीफ साहेब'

पान १ वरून त्यांची पुण्याई खात्यात जमा झालेली आहे.

प्रत्येकाच्या आयुष्यात चढ-उतार येत असतात. ज्यावेळी राज्यात पक्षाचे नेतृत्व नसतानाही त्यांनी कागल विधानसभा मतदारसंघास निधीची कधीच कमतरता भासू दिली नाही. असं खंबीर नेतृत्व कागल तालुक्याला लाभलं आहे. ते जे बोलतात ते करून दाखवतात. हजारो गोरगरिबांना पेन्शन मंजूर केल्या, निराधार वृद्धांना श्रावण बाळ पेन्शन मंजूर करून घेतल्या, रमाई घरकुल योजनेतून ज्यांना झोपडी मिळत नव्हती अशा लोकांना घरकुले बांधून दिली, लाखो शेतकरी बांधवांची कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती बँकेतून प्रगती केली. शेतकरी सुखी झाला पाहिजे असे त्यांना नेहमी वाटत असते.

कागल शहरात शिवरायांचा पुतळा लोकवर्गणीत स्वतः पुढाकार घेऊन उभारला. कागलमध्ये आपल्या फंडातून निधी भव्य श्री राम मंदीरासाठी दिला. कागल तालुक्यात अनेक मंदिरांचे सुशोभीकरण केले. वाड्या-वस्त्यांवर पाण्याची समस्या होती. माता-भगिनींना चार चार किलोमीटर पाण्यासाठी पायपीट करावी लागत होती. अशा ठिकाणी कुपनलिका खोदल्या. अनेकांना रोजगार उपलब्ध करून दिले. पंचतारांकित औद्योगिक वसाहत उभी करून बेरोजगारी कमी करण्याचा प्रयत्न केला. तरुणांना काम उपलब्ध करून दिले. नवीन उद्योगासाठी मदत केली.

माती आणि पाण्याचे योगदान महत्त्वाचे असते. कागलच्या मातीने व पवित्र पाण्याने अनेक थोर माणसे निर्माण केली. साहित्य, राजकारण, कला, क्रीडा व कृषी क्षेत्रातील अशी माणसे छ. शाहूंच्या या जन्मभूमीत निर्माण झाली. याच मातीत आमदार हसन मुश्रीफ यांच्या सारखा मातब्बर नेता तयार झाला आहे.

पंचायत समिती सभापती पदापासून ते डझनभर मंत्री पदाचा कार्यभार सांभाळणाऱ्या मुश्रीफ यांचा राजकीय प्रवास थक्क करणारा आहे. विकास कामे, राजकीय संघटन कौशल्य, प्रचंड उर्जा या गुणांमुळे आमदार हसन मुश्रीफ प्रसिद्धीला आले. विकास नेता म्हणून त्यांचा हात कोणीही धरू शकत नाही. हाती घेतलेले कोणतेही काम कितीही कठीण असले तरी ते पूर्णत्वास नेण्याची त्यांची ख्याती आहे. प्रसंगी त्यांनी यासाठी अनेक कायद्यात बदल करून सामान्य जनतेला अभिमुख कायदे केले. हीच त्यांच्या कार्याची ओळख आहे. दिलेला शब्द पाळणारा नेता म्हणून साहेबांचं नाव आहे. त्यासाठी मुश्रीफ यांची चाळीस वर्षाची समृद्ध राजकीय कारकीर्द एक सुंदर पुरावा आहे. अशा या नेतृत्वाला त्यांच्या वाढदिवसा निमित्त त्यांना त्रिवार अभिनंदन... !

श्री गहिनीनाथ लाईट हाऊस, कागल
सागर बेकरीच्या खाली व एस बँकेच्यासमोर कागल, ता.कागल

प्रोप्रा . सुमित सणगर
संपर्क : ७५०७४७४१२३
विविध प्रकारची लायटींग, रंगीत बल्ब, विद्युत माळा मिळतील
गॅस गिझर आणि पाणी तापवण्याचे हिटर मिळेल










**YouTube**

**गहिनीनाथ समाचार आता 'यु ट्यूब' वर**

ताज्या घडामोडींसह अपडेट राहण्यासाठी आजच यु ट्यूब चॅनेलवर गहिनीनाथ समाचारला सबस्क्राइब करा. आणी आपल्या परिसरातील ताज्या घडामोडी सर्वात आधी जाणून घ्या !

https://www.youtube.com/@GahininathSamachar




